स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ / /25-26**
दिनांक ३०/०१/२०२६

घनकचरा व्यवस्थापन विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा विभागामार्फत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन व क्षेपणभूमीवर वाहतूक करणे या नव्याने दिलेल्या कंत्राटाबाबत काही वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

यापुर्वीचे सदर कामाचे कंत्राट हे दि.३१/१२/२०१९ रोजी देण्यात आलेले होते. त्याची मुदत १ वर्षाने म्हणजेच दि.३०/१२/२०२० रोजी संपली. त्यानंतर त्यांना १६ वेळा मुदतवाढ देण्यात आली. यामुळे सद्यःस्थितीत सदर कंत्राट हे मुदत संपल्याने रद्द करुन नव्याने निविदा काढणे आवश्यक होते. नविन निविदा काढेपर्यंत जुन्या कंत्राटदारास मुदतवाढ देण्यात आली होती.

दरम्यान सदरचे काम वारंवार मुदतवाढ देऊन पुढे सुरु ठेवणे प्रशासकीयदृष्ट्या अयोग्य असल्यामुळे नविन निविदा काढणेकामी प्रशासकिय मान्यता आदेश ठराव क्र. १२९०, दि.२५/०९/२०२५ अन्वये नविन कामास प्रशासकिय मान्यता घेण्यात आली. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ए ते आय हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणेकामाच्या सन २०२५-२६ ते २०२९- ३० या पाच वर्षाकरिता प्रभाग निहाय नऊ निविदा दि. २६/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या.

सदरच्या नऊ कामांच्या विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांची छाननी करुन निविदा समितीची मान्यता घेऊन ए ते आय या नऊ कामांना मा.आयुक्त तथा प्रशासक दि.१२/१२/२०२५ अन्वये निविदा मंजूरी ठराव घेण्यात आला आहे. त्यानुसार मंजूर ठेकेदारांस दि. १५/१२/२०२५ रोजी या कामाचे स्विकृती पत्र देण्यात आले आहे.

तथापि दि.१५/१२/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. राज्य निवडणुक आयोगाने महानगरपालिकेची निवडणुक जाहिर केल्याने तात्काळ प्रभावाने आचारसंहिता लागू झाली होती. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत मा. राज्य निवडणूक यांना सदरच्या कामाचे कार्यादेश देणेची परवानगी मिळणेकामी दि. १५/१२/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे विनंती करण्यात आली. मा.राज्य निवडणुक आयोग यांनी दि. २८/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर कामांस कार्यादेश निर्गमित करण्याची परवानगी दिली आहे. त्यानुसार प्रभाग ए ते आय या ९ कामांस दि.०९/०१/२०२६ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. निविदेमध्ये ३ महिन्याच्या तयारीचा कालावधी नमुद असुन त्यानुसार निविदाकारांनी काम करण्यास तयार असल्याचे कळविल्यामुळे दि. १९/०१/२०२६ रोजी जूना ठेका बंद करुन नविन ठेका सुरु करण्यात आलेला आहे.

जुन्या ठेकाधारकांकडुन कर्मचाऱ्यांची काही देणी बाकी असल्यास जून्या ठेकेदारांच्या महानगरपालिकेमध्ये जमा असलेल्या बँक गॅरंटी व सुरक्षा अनामत मधुन सदरची देणी देण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

सदरची निविदा प्रक्रीया सप्टेंबर २०२५ मध्ये सुरु करण्यात येऊन त्याचा कार्यादेश दि.९ जानेवारी २०२६ रोजी देण्यात आला. त्यामुळे सदरची प्रक्रीया सर्व नियमांचे पालन करुन तसेच मा. राज्य निवडणूक आयोगाची रितसर परवानगी घेऊन पार पडली असल्याने सदरबाबत प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नाही.